# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (आस्थापना विभाग)

१ला माळा, छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारत,

महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स नागपूर-४४०००१

Email Id- recruitmentnagpurmunicipalcorp@gmail.com Website- https://nmcnagpur.gov.in


जाहिरात क्र.३९९/पी.आर दि.२२.०८.२०२५

## **‘पदभरतीची सविस्तर जाहिरात’**

नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे आस्थापनेवरील खालील नमूद केलेल्या गट-क संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने (नामनिर्देशनाने) भरण्याकरीता आयोजित परीक्षेसाठी या जाहीरातीत नमूद केल्याप्रमाणे पदाची शैक्षणिक अर्हता व इतर अटींची पूर्तता करण्या-या पात्र उमेदवारांकडुन विहीत मुदतीत नागपूर महानगरपालिकेच्या https://nmcnagpur.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

### १.१. परीक्षेसाठी अर्ज सादर करणेचे वेळापत्रक

| अ.क्र | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १ | परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकृतीचा कालावधी | दि.२६.०८.२०२५ ते दि.०९.०९.२०२५ |
| २ | परीक्षेसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणेचा अंतिम दिनांक | दि.०९.०९.२०२५ |
| ३ | ऑनलाईन पध्दतीने विहीत परीक्षा शुल्क भरण्याचा दिनांक | दि.२६.०८.२०२५ ते दि.०९.०९.२०२५ |
| ४ | परीक्षेकरीता प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा दिनांक | https://nmcnagpur.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल |
| ५ | ऑनलाईन परीक्षेचा दिनांक | |

१.१.१. वरील पद भरतीसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे पदनिहाय परीक्षा ऑनलाईन पध्दतीने (Computer Based Test) विहीत करण्यात येणा-या परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल. परीक्षेसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन आवश्यकता असल्यास सदर परीक्षा ही एकापेक्षा अधिक दिवशी व एकापेक्षा अधिक सत्रात घेण्यात येईल. अशा प्रत्येक सत्रातील परीक्षेसाठी विहीत केलेल्या अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळी प्रश्नपत्रिका असेल. संबंधीत उमेदवारास त्याचा प्रत्यक्ष परीक्षा दिनांक, वेळ व परीक्षा केंद्राचा तपशील परीक्षा प्रवेशपत्राद्वारे वरील प्रमाणे नमुद संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल.

१.१.२. या वेळापत्रकामध्ये काही बदल झाल्यास, सुधारीत वेळापत्रक फक्त नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

१.१.३. परीक्षा व यापुढील निवड प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१.१.४. वर नमूद पध्दतीऐवजी इतर कोणत्याही मार्गाने,वैयक्तिकरित्या उमेदवारास कळविण्यात येणार नाही सबब सर्व उमेदवारांनी निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत **वेळोवेळी / नियमितपणे** वरील संकेतस्थळाला भेट द्यावी.

१.१.५. नागपूर महानगरपालिका अंतर्गत संवर्गनिहाय पदांसाठी घेण्यात येणा-या परीक्षांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | पदाचे नाव (गट-क) | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी (रुपये) | भरावयाची पद संख्या (स.से) |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | एस-६ : रू १९,९००-६३,२०० | ६० |
| २ | विधी सहायक | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | ०६ |
| ३ | कर संग्राहक | एस-६ : रू १९,९००-६३,२०० | ७४ |
| ४ | ग्रंथालय सहायक | एस-६ : रू १९,९००-६३,२०० | ८ |
| ५ | स्टेनोग्राफर | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | १० |
| ६ | लेखापाल/ रोखपाल | एस-१३ : रू ३५,४००-१,१२,४०० | १० |
| ७ | सिस्टीम ॲनॉलिस्ट | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | १ |
| ८ | हार्डवेअर इंजिनियर | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | २ |
| ९ | डेटा मॅनेजर | एस-१४ : रू ३८,६००-१,२२,८०० | १ |
| १० | प्रोग्रमर | एस-८ : रू २५,५००-८१,१०० | २ |
| | | **एकूण** | **१७४** |

२.१. **नागपूर महानगरपालिका सेवानिहाय भरतीसाठी उपलब्ध रिक्त पदांचा तपशील**

२.१.१ सदर भरतीमध्ये सरळसेवेची रिक्त असलेली आवश्यक पदे भरण्यात येणार असल्याने, जाहीरातीत नमूद करण्यात आलेली आरक्षित पदे निव्वळ अनुशेषानुसार दर्शविण्यात आलेली आहेत.

२.१.२ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग दि. २७ फेब्रुवारी, २०२४ चे शासन निर्णय चे धर्तीवर सरळसेवा भरतीसाठी आरक्षणाचा तपशील म.न.पा पदभरतीसाठी पुढीलप्रमाणे राहील. {अनुसूचित जाती-अ.जा, अनुसूचित जमाती- अ.ज , निरधारीत जमाती (विमुक्त जाती – अ (वि.जा.-अ)/ भटक्या जमाती –ब (भ.ज.-ब)/ भटक्या जमाती –क (भ.ज.-क)/ भटक्या जमाती –ड (भ.ज.-ड)), विशेष मागास प्रवर्ग- वि.मा.प्र., इतर मागास वर्ग- इ.मा.व., सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग-एसईबीसी, आर्थिकदृष्टया दूर्बल घटक- आ.दु.घ., व समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

**टिप:- पदभरती करावयाच्या पदांचे आरक्षणाचा तपशील हा, भरावयाची पदे व मंजूर संवर्गात कार्यरत प्रवर्गनिहाय पदे याचा विचार करून प्रवर्गनिहाय योग्य प्रतिनिधीत्व मिळण्याचे दृष्टीकोणातून निश्चित करण्यात आला आहे.**

**पदनाम- कनिष्ठ लिपीक (Junior Clerk) भरावयाची रिक्त पदे- ६०**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०७** | **०९** | **०४** | **०३** | **०५** | **०३** | **०३** | **०** | **०६** | **०६** | **४६** | **१४** | **६०** |
| सर्वसाधारण | ३ | ४ | २ | २ | १ | २ | २ | ० | २ | २ | २० | ५ | २५ |
| महिला आरक्षण (३० %) | २ | ३ | १ | १ | २ | १ | १ | ० | २ | २ | १५ | ४ | १९ |
| माजी सैनिक (१५ %) | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | ६ | २ | ८ |
| खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदविधर अंशकालीन (१० %) | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | १ | ५ | १ | ६ |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे – ०२ (अंध/अल्पदृष्टी-०१ पदे, कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता-०१ पदे) | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०१ | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | ७ | ९ | ४ | ३ | ५ | ३ | ३ | ० | ६ | ६ | ४६ | १४ | ६० |

## पदनाम- विधी सहायक (Law Assistant) भरावयाची रिक्त पदे -०६

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०१** | **०** | **०१** | **०** | **०** | **०** | **०** | **०१** | **०१** | **०** | **०४** | **०२** | **०६** |
| सर्वसाधारण | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ०४ | १ | ०५ |
| महिला आरक्षण (३० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदविधर अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ४ | २ | ६ |

## पदनाम- कर संग्राहक (Tax Collector) भरावयाची रिक्त पदे-७४

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०** | **१६** | **६** | **०** | **५** | **५** | **१** | **०** | **७** | **७** | **४७** | **२७** | **७४** |
| सर्वसाधारण | ० | ५ | २ | ० | १ | १ | १ | ० | ३ | ३ | १६ | ९ | २५ |
| महिला आरक्षण (३० %) | ० | ५ | २ | ० | २ | २ | ० | ० | २ | २ | १५ | ८ | २३ |
| माजी सैनिक (१५ %) | ० | २ | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | ७ | ४ | ११ |
| खेळाडु (५ %) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | २ |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| पदविधर अंशकालीन (१० %) | ० | २ | १ | ० | १ | १ | ० | ० | १ | १ | ७ | ३ | १० |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे -०३ (अंध/अल्पदृष्टी-०१ पदे, कर्णबधीरता अथवा ऐकु येण्यातील दुर्बलता-०१ पदे, अस्थीव्यंगता/ मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy/ कुष्ठरोग मुक्त (leprosy cured) /शारीरिक वाढ खुंटणे (dwarfism) / आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims/ स्नायु विकृती (muscular dystrophy)-०१ पदे | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०१ | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | ० | १६ | ६ | ० | ५ | ५ | १ | ० | ७ | ७ | ४७ | २७ | ७४ |

## पदनाम- ग्रंथालय सहायक (Library Assistant) भरावयाची रिक्त पदे -८

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| **प्रवर्ग तसेच टक्केनुसार** | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०१** | **०१** | **०१** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **१** | **१** | **०६** | **२** | **०८** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ६ | १ | ७ |
| महिला आरक्षण (३० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदविधर अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ६ | २ | ८ |

## पदनाम- स्टेनोग्राफर (Stenographer) भरावयाची रिक्त पदे -१०

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| **प्रवर्ग तसेच टक्केनुसार** | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु.घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **१** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | **१** | **१** | **०८** | **२** | **१०** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | १ | १ | १ | ०७ | १ | ०८ |
| महिला आरक्षण (३० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ०१ | १ | ०२ |
| माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदविधर अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | २ | १ | १ | ८ | २ | १० |

**पदनाम- लेखापाल/ रोखपाल (Accountant/Cashier) भरावयाची रिक्त पदे -१०**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अजा पदे | अज पदे | विजा (अ) पदे | भज (ब) पदे | भज (क) पदे | भज (ड) पदे | विमाप्र पदे | इमाव पदे | साशैमाप्र | आ.दु. घ पदे | एकूण आरक्षित पदे | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **१** | **१** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **२** | **१** | **१** | **७** | **३** | **१०** |
| सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | १ | ६ | २ | ०८ |
| महिला आरक्षण (३०%) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ०१ | ०२ |
| माजी सैनिक (१५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| खेळाडु (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| प्रकल्पग्रस्त (५ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| भूकंपग्रस्त (२ %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| पदविधर अंशकालीन (१० %) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| दिव्यांग (४ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| अनाथ (१ %) | एकूण पदे - ०० | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | १ | ७ | ३ | १० |

**पदनाम- सिस्टीम ॲनॉलिस्ट (System Analyst) भरावयाची रिक्त पदे -०१**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| पदांचे नाव | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|
| **System Analyst** | **०१** | **०१** |

**पदनाम- हार्डवेअर इंजिनियर (Hardware Engineer) भरावयाची रिक्त पदे -०२**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अनुसूचित जाती | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०१** | **०१** | **०२** |

**पदनाम- प्रोग्रामर (Programmer) भरावयाची रिक्त पदे -०२**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| प्रवर्ग तसेच टक्केनुसार | अनुसूचित जाती | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|---|
| **एकूण पदे** | **०१** | **०१** | **०२** |

**पदनाम- डेटा मॅनेजर (Data Manager) भरावयाची रिक्त पदे -०१**

भरावयाच्या रिक्त पदांचा सामाजिक/ समांतर आरक्षणाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे राहील:

| पदांचे नाव | अराखीव | एकूण पदे |
|---|---|---|
| **Data Manager** | **०१** | **०१** |

# पदनिहाय आवश्यक शैक्षणिक पात्रता

| अक्र | पदनाम | | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ लिपीक | अ)<br>ब)<br><br>क) | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र. मि. व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र. मि. वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>संगणक अर्हतेबाबत शासन वेळोवेळी निश्चित करण्याऱ्या धोरणानुसार आवश्यक पात्रता |
| २ | विधी सहायक | अ)<br>ब) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची विधी शाखेची पदवी आणि<br>शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेकडील न्यायालयीन कामाशी संबंधीत पदावरील किमान ५ वर्षाची नियमित सेवा किंवा सत्र न्यायालयातील ५ वर्षे वकीलीचा अनुभव. |
| ३ | कर संग्राहक | अ)<br>ब)<br><br>क) | कोणत्याही शाखेची पदवी आणि<br>मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र. मि. व इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र. मि. वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्या प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.<br>संगणक अर्हतेबाबत शासन वेळोवेळी निश्चित करणाऱ्या धोरणानुसार आवश्यक पात्रता. |
| ४ | ग्रंथालय सहायक | अ)<br><br>ब) | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत परीक्षा (S.S.C) उत्तीर्ण<br>ग्रंथालयाचा सर्टीफिकेट कोर्स |
| ५ | स्टेनोग्राफर | <br>अ)<br>ब)<br>क)<br>ड) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>मराठी व इंग्रजी लघुलेखक ८० श.प्र.मि परिक्षा उत्तीर्ण.<br>संगणक अर्हतेबाबत शासन वेळोवेळी निश्चित करणाऱ्या धोरणानुसार आवश्यक पात्रता<br>शासनाची मराठी ४० व इंग्रजी ६० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण.<br>अनुभव : शासकीय/निमशासकीय कार्यालयातील स्टोनोटायपिस्ट पदाचा ३ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ६ | लेखापाल/ रोखपाल | अ)<br>ब)<br><br>क) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी.<br>भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेट (डी.एफ.एम) पदविका उत्तीर्ण अथवा L.G.S.D किंवा G.D.C & A परिक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाकडील लिपीक (लेखा) या पदावरील किमान ५ वर्षाची नियमित सेवा. |
| ७ | सिस्टीम ॲनॉलिस्ट | अ)<br><br>ब)<br>क) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील AICTE द्वारा मान्यताप्राप्त पदवी (B.E Computer) अर्हता आणि<br>सिस्टीम ॲनॉलिसिस/प्रोग्रामिंग / सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील ३ वर्षाचा अनुभव.<br>महानगरपालिकेमधील माहिती व तंत्रज्ञान विभागात सध्या कार्यरत उपरोक्त नमूद अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांना प्राधान्य असेल. |
| ०८ | हार्डवेअर इंजिनियर | अ)<br><br>ब)<br>क) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकी मधील AICTE द्वारा मान्यताप्राप्त पदवी (B.E Computer) आणि संगणक देखभाल व दुरुस्तीचा ३ वर्षाचा अनुभव किंवा<br>मान्यताप्राप्त विद्यापिठाची Computer Hardware मधील पदविका आणि ५ वर्षाचा अनुभव.<br>महापालिकेमधील माहिती व तंत्रज्ञान विभागात सध्या कार्यरत उपरोक्त नमूद अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांना प्राधान्य असेल. |
| ०९ | प्रोग्रामर | अ)<br>ब)<br>क) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदविका (Diploma) अर्हता आणि<br>सिस्टीम ॲनलिसिस/प्रोग्रामिंग/सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील १ वर्षाचा अनुभव<br>महापालिकेमधील माहिती व तंत्रज्ञान विभागात सध्या कार्यरत उपरोक्त नमूद अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांना प्राधान्य असेल. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | डेटा मॅनेजर | अ)<br>ब)<br>क) | मान्यताप्राप्त विद्यापिठाची संगणक अभियांत्रिकीमधील AICTE द्वारा मान्यताप्रापत पदवी (B.E Computer) अर्हता आणि<br>सिस्टीम ॲनालिसिस/प्रोग्रामिंग / सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट मधील ३ वर्षाचा अनुभव<br>महापालिकेमधील माहिती व तंत्रज्ञान विभागात सध्या कार्यरत उपरोक्त नमूद अर्हता प्राप्त कर्मचाऱ्यांना प्राधान्य असेल. |

**३.१. <u>पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-</u>**

३.१.१. जाहीरातीत नमूद केलेल्या पद संख्येत व प्रवर्गनिहाय आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

३.१.२. सदर जाहीरात रद्द करण्याचा अधिकार मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचेकडे राखीव ठेवलेला आहे.

३.१.३. पदसंख्या व आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतची सूचना वेळोवेळी नागपूर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

३.१.४. परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व प्रवर्गनिहाय पद संख्येमध्ये बदल करणे व जाहीरातीत नमूद वरील संवर्गापैकी कोणत्याही संवर्ग व त्या अंतर्गत समाजिक/समांतर आरक्षण स्थागित ठेवणे व रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांचे कडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

३.१.५. महिला, खेळाडु, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त , भुकंपग्रस्त , अंशकालीन, दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या प्रचलित आदेश/ नियम यानुसार राहील.

३.१.६. विविध मागास प्रवर्ग, महिला, प्राविण्य प्राप्त खेळाडू, अनाथ इं. साठी सामाजिक व समांतर आरक्षण शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या आदेशानुसार राहील.

३.१.७. महिलांसाठी आरक्षित पदांकरीता दावा करणा-या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे.तसेच महिला व बालविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांचे शासन निर्णय क्र. महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ०४.०५.२०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरती निवड करीता नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्राची अट रद्द करण्यात आलेली आहे. तसेच अनुसूचति जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवड साठी दावा करणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासना विभागाकडून वेळोवेळीविहीत नमुन्यात नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.१.८. एखादी जात/जमात राज्य शासनाकडून आरक्षणासाठी पात्र असल्याचे घोषित केली असल्यासच तसेच सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले जात प्रमाणपत्र उमेदवाराकडे अर्ज करतानाच उपलब्ध असेल तर संबंधीत जात/जमातीचे उमेदवार आरक्षणाच्या दाव्यासाठी पात्र असतील.

३.१.९. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दि. १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक संकिर्ण-१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर,२०१८ तसेच शासन परीपत्रक क्रमांक : राआधो ४०२४/प्र.क्र.१४ /१६-अ दि.२५ जानेवारी २०२४ आणि तद्नंतर शासनाने यासदंर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१.१०. आर्थिकदृष्टया दूर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रूवारी, २०१९ व दिनांक ३१ मे,२०२१ आणि तद्नंतर शासनाने यासदंर्भात वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.तसेच सदर

संवर्गातील उमेदवारांकरीता शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३.१.११. अद्ययावत नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र / आर्थिकदृष्टया दूर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा म्हणून सक्षम प्राधिका-याने वितरीत केलेले व अर्ज सादर करण्याच्या **<u>अंतिम दिनांकास वैध असणारे</u>** प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३.१.१२. सेवा प्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा अराखीव (खुला) पदावरील निवडीकरीता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

३.१.१३. आराखीव (खुला) उमेदवाराकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषसंदर्भातील अटीची पुर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारासह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित / उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मुळ प्रवर्गा संदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३.१.१४. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा लाभ हा केवळ महाराष्ट्राचे अधिवासी असणा-या उमेदवारांना अनुज्ञेय आहे.

३.१.१५. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (समाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधीत कायदा/ नियम/ आदेशानुसार विहीत नमुन्यातील वैध प्रमाणपत्र प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्यासाठी विहीत केलेल्या दिनांकापूर्वीचे उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्राच्या कालावधी संबंधीत शासन आदेशावरील तरतुदीनुसार लागु असेल व त्याप्रमाणे ग्राह्य समजण्यात येईल.

३.१.१६. सामाजिक व समांतर आरक्षणा संदर्भात विविध न्यायालयामध्ये दाखल न्यायप्रविष्ट प्रकरणी अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदभरतीची कार्यवाही करण्यात येईल.

३.१.१७. सामाजिक अथवा समांतर आरक्षणाचा अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा/नियम/ आदेशानुसार विहित नमुन्यातील पूर्व परीक्षेच्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र उपलब्ध असणे अनिवार्य आहे. वैध प्रमाणपत्रांचा कालावधी संबंधित शासन आदेशावरील तरतुदीनुसार (लागू असेल त्याप्रमाणे) ग्राहृय समजण्यात येईल.

३.१.१८. समांतर आरक्षणाबाबत उमेदवारांचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

३.१.१९. शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक बीबीसी-११८३/११८/१६-ब दिनांक २५ जानेवारी १९८९ मधील तरतुदी नुसार आरक्षित पदासाठी अर्ज करणारा उमेदवार हा महाराष्ट्राचा सर्वसधारणपणे रहिवासी असावा व महाराष्ट्र राज्यासाठी अधिसुचित केलेल्या संबंधित प्रवर्गातील असावा.

३.१.२०. वर नमूद माजी सैनिक, खेळाडू, महिला, पदवीधर अंशकालीन उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, दिव्यांग,अनाथ मुले यांचेकरीता असलेले आरक्षण हे समांतर आरक्षण असून ते सामाजिक आरक्षणांतर्गत समाविष्ठ आहे. तसेच माजी सैनिक, खेळाडू, महिला, पदवीधर अंशकालीन उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, अनाथ मुले यांच्यासाठीचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३.१.२१. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांचा ज्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध असल्यास (Validity Certificate) ऑनलाईन अर्ज सादर करतांना सादर करणे आवश्यक आहे.

३.१.२२. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीबीसी - २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२ डिसेंबर २०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५ ऑगस्ट, २०११ रोजी दिलेल्या

आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरते नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

३.१.२३. विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क) भटक्या जमाती (ड) प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधीत वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्यावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

३.१.२४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी/प्र.क्र.७५/१६-क, दि. २७ फेब्रुवारी, २०२४ अन्वये सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरीता आरक्षण विहित करण्यात आले असून शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग,क्र.-बीसीसी-२०२४/प्र.क्र.७५/आरखण-५,दि. २८ जून, २०२४ व दि.०५ जुलै,२०२४ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार विहित करण्यात आलेले जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३.१.२५. शासन शुध्दीपत्रक, इतर समाज बहुजन कल्याण विभाग, क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.७६/मावक, दि. ०९ मार्च, २०२३ अन्वये शासनाकडून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार , संबंधित उमेदवार उन्नत आणि प्रगत व्यक्ती / गटात मोडत नसल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी कालावधी विचारात घेण्यात येईल. प्रस्तुत संवर्गाकरीता २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे उन्नत आणि प्रगत व्यक्ती/ गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

३.१.२६. या जाहीरातीत नमूद समाजिक तसेच समांतर आरक्षण निहाय उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करणे अनिवार्य आहे, उमेदवारांनी नमूद समाजिक तसेच समांतर आरक्षण व्यतीरिक्त अर्ज सादर केले असल्यास त्यांना ग्राह्य धरण्यात येणार नाही तसेच शुल्क परत करण्यात येणार नाही.

३.१.२७. उमेदवारांनी या जाहीरातीच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे राजकिय वशिला/ शिफारस/ दबाव तंत्राचा वापर केल्यास त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**४.१ <u>खेळाडू आरक्षण :-</u>**

४.१.१ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमाकः राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, तसेच शासन शुध्दीपत्रक, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमाक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२. दिनांक १८ ऑगस्ट २०१६ शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक संकीर्ण-१७१६/प्र.क्र.१८/क्रीयुसे-२, दिनांक ३० जून, २०२२ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार प्राविण्यप्राप्त खेळाडू आरक्षणा संदर्भात तसेच वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

४.१.२ प्राविण्य प्राप्त असलेल्या आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांच्या बाबतीत क्रिडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले पात्र खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र पूर्व परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

४.१.३ विहित दिनांकास खेळाचे प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उपसंचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांका पूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाकरीता पात्र समजण्यात येणार नाही. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे सक्षम क्रिडा प्राधिकरणाने निर्गमित केलेले क्रिडा प्रमाणपत्र नसल्यास अथवा सदर प्राधिकरणाकडे क्रिडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी केलेल्या अर्जाची पोचपावती सादर केली नसल्यास संबंधित उमेदवाराचा खेळाडूकरीत आरक्षित पदावर विचार करण्यात येणार नाही.

४.१.४ एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणा-या खेळाडू उमेदवाराने एकाचवेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उपसंचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

४.१.५ मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करतांना खेळाडू उमेदवारांनी विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणी बाबतच्या अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारशी /नियुक्ती करीता विचार करण्यात येईल.

**५.१ <u>अनाथ आरक्षण :-</u>**

५.१.१ अनाथ व्यक्तीचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्रं. अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३ दि. ६ एप्रिल, २०२३, दि.१० मे २०२३ अनुसार तसेच शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील.

५.१.२ अनाथ आरक्षण धोरण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,पूरक पत्र, क्र: अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.१० मे, २०२३ अन्वये एखाद्या भरती प्रक्रियेमध्ये अनाथ आरक्षणाच्या एका प्रवर्गासाठी उपलब्ध जागांवर गुणवत्तेनुसार त्या प्रवर्गातील अनाथ उमेदवार पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होऊ शकले नाहीत, तर त्या भरती प्रक्रियेमध्ये ती पदे अनाथांच्या दुस-या प्रवर्गातील उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

५.१.३ अनाथांसाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गाचा आहे, त्या प्रवर्गातून करण्यात येईल.

५.१.४ सदर जाहीरातीतील पदांच्या अनुषंगाने अनाथ आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवरांनी दि.०६ सप्टेंबर, २०२२, दि. ०६ एप्रिल, २०२३ आणि दि.१० मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार विहित नमुन्यातील अनाथ प्रमाणपत्र व महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र आयोगाकडून निश्चित करण्यात येणा-या विहित कालावधीत सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा अनाथ आरक्षणाचा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**६.१. <u>माजी सैनिक आरक्षण :-</u>**

६.१.१ उमेदवार स्वत: माजी सैनिक असल्यास त्याने त्याबाबत स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यास माजी सैनिकांना अनुज्ञेय असलेले लाभ मिळणार नाहीत.

६.१.२ माजी सैनिकांकरीता आरक्षणासंदर्भातील तरतुदी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार असतील.

**७.१ <u>प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण :-</u>**

७.१.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एईएम-१०८०/३५/१६-अ, दि. २० जानेवारी, १९८० तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**८.१ <u>भूकंपग्रस्तांसाठीचे आरक्षण :-</u>**

८.१.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : भूकंप-१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६-अ, दि. २७ ऑगस्ट, २००९ तसेच या संदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणाऱ्या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील.

**९.१ <u>पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन उमेदवार</u>**

९.१.१ शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, २७.१०.२००९ व क्र.अंशका १९१३/प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दिनांक: १९ सप्टेंबर २०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३

वर्षापर्यंत दरमाह मानधनावरकाम केलेल्या उमेवाराने सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असणे आवश्यक राहील. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचा-यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसीलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या आदेशानुसार पदवीधर/ पदवीधारक अंशकालीन कर्मचारी यांचे करीता आरक्षण राहील.

**१०.१ <u>दिव्यांग आरक्षण :-</u>**

**१०.१.१** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम , २०१६ च्या आधारे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग , क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६ अ. दि. २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडुन वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार दिव्यांग व्यक्तीच्या आरक्षणासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

**११.१ <u>सर्वसामान्य पात्रता :-</u>**

११.१.१ भारतीय नागरिकत्व

**१२.१ <u>वयोमर्यादा :-</u>**

१२.१.१ सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि.२५ एप्रिल २०१६ मधील तरतुदीनुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी वयोमर्यादा किमान १८ वर्ष असावे व कमाल वय ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

१२.१.२ सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२, दि.२५ एप्रिल २०१६ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत किमान १८ वर्ष असावे व कमाल वय ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

१२.१.३ एखादा उमेदवार वयोमर्यादेतील सवलतीपैकी एकापेक्षा जास्त सवलतीकरीता पात्र ठरत असल्यास पात्र सवलतीपैकी अधिकतम सवलत अनुज्ञेय राहील.

१२.१.४ सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि.०६/१०/२०१० अन्वये स्वातंत्र सैनिकांचे पाल्य यांचे करिता कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहील.

## वयोमर्यादेबाबत निकष दर्शविणारा तक्ता

<table>
<tr><th rowspan="3">वयोमर्यादा गणण्याचा दिनांक</th><th rowspan="3">किमान वर्यामर्यादा सर्व पदांकरिता</th><th colspan="10">कमाल वयोमर्यादा सर्व पदांकरिता</th></tr>
<tr><th rowspan="2">अराखीव</th><th rowspan="2">मागासवर्गीय / आ.दु.घ./ अनाथ</th><th colspan="3">माजी सैनिक</th><th colspan="2">प्राविण्य प्राप्त खेळाडू</th><th rowspan="2">दिव्यांग व्यक्ती उमेदवार</th><th rowspan="2">प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त</th><th rowspan="2">पदवीधर/ पदवीधारक अंशकालीन उमेदवार</th></tr>
<tr><th>अराखीव</th><th>मागासवर्गीय आ.दु.घ./ अनाथ</th><th>दिव्यांग</th><th>अराखीव</th><th>मागासवर्गीय आ.दु.घ./ अनाथ</th></tr>
<tr><td rowspan="2">०९.०९.२५</td><td rowspan="2">१८</td><td rowspan="2">३८</td><td rowspan="2">४३</td><td>३८ + सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे</td><td>४३ + सैनिकी सेवेचा कालावधी अधिक ३ वर्षे</td><td rowspan="2">४५</td><td colspan="2" rowspan="2">४३</td><td rowspan="2">४५</td><td rowspan="2">४५</td><td rowspan="2">५५</td></tr>
<tr><td colspan="2">माजी सैनिक करिता कमाल वयोमर्यादा ५५ वर्षे इतकी राहील</td></tr>
</table>

**१३.१.१ <u>संगणक हाताळणी/ वापराबाबतचे ज्ञान :-</u>**

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण - 2000/ प्र.क्र.61/ 2001/39, दिनांक 19/03/2003 मधील तरतूदीनुसार D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा ० स्तर A स्तर किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस-2012 / प्र.क्र.277/39, दिनांक 04/02/2013, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन शुद्धीपत्रक क्रमांक मातंसं 2012/प्र.क्र 10 277/39, दिनांक 31/03/2017, सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन पुरकपत्र क्रमांक मातंसं 2012/ प्र.क्र.277/39 दिनांक 08/01/2018 व सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय क्रमांक मातंसं 2012/ प्र.क्र.277/39, दिनांक 16/07/2018 मध्ये नमूद केल्यानुसार संगणक अर्हता आवश्यक आहे. तथापि वित्त विभाग, शासन अधिसूचना क्रमांक सेवाप्र-2023/प्र.क्र.06/कोषा (प्रशा-3), दिनांक 09/09/2024 नुसार नियुक्तीपूर्वी संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/ प्र.क्र.61/2001/39, दिनांक 19/03/2003 मधील तरतूदीनुसार संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत धारण करणे आवश्यक राहतील.

**१३.१.२ टंकलेखन अर्हता धारण करण्यातून तात्पुरती सूट :-.**

समांतर आरक्षणामधील दिव्यांग उमेदवार यांना सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र:अपंग २०१६/प्र.क्र.११६/१६-अ, दि. १६ नोंव्हेबर २०१६ व प्रकल्पग्रस्त , भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य,अंशकालीन पदविधर/पदवीधारक उमेदवार यांना सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र. संकीर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ दि.०४ सप्टेंबर २०१५ व माजी सैनिक उमेदवार यांना सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७/का.२८ दि. ३० मे, २०२३ तसेच अनाथ उमेदवार यांना महिला व बाल विकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक अनाथ -२०२२/प्र.क्र-८४/का-०३ दि. ०७ जुलै, २०२२ अन्वये टंकलेखन अर्हता धारण करण्याची तुरतुदी लागू राहतील.

**१३.१.३ <u>मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक</u>**

**१३.१.४ <u>अर्हता / पात्रता गणन्याचा दिनांक</u>**

विहित शैक्षणिक अर्हता/वय/अनुभव/पात्रता विषयक अर्हता धारण केल्याचा दिनांक हा अर्ज स्विकृतीचा अंतिम दिनांक गणला जाईल.

**१४.१ <u>निवडप्रक्रिया:-</u>**

**१४.१.१** जाहिरातीमध्ये नमूद अर्हता/पात्रतेविषयक अटी किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार शिफारशीसाठी पात्र असणार नाही.

**१४.१.२** सेवा भरतींची संपूर्ण प्रक्रिया खालील शासन निर्णय क्र.प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि.०४ मे,२०२२ व सेवा प्रवेश नियम अथवा तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा तसेच म.न.पा द्वारे वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या कार्यनियमावलीतील तरतुदीनुसार राबविण्यात येईल.

१) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील, नागपूर महानगरपालिकेच्या १७९८१ पदांच्या एकत्रित आकृतीबंध नियम दि.१० मे, २०२३

२) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील,नागपूर महानगरपालिकेचे सेवाप्रवेश नियम दि.०८ डिसेंबर, २०२३

## **१४.२ निवडीची पध्दत :-**

१४.२.१ सर्व पदांसाठी संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन परीक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात घेण्यात येईल. परीक्षा राज्यातील निश्चित केलेल्या केंद्रावर घेण्यात येईल.

१४.२.२ नियुक्तीच्या पात्रतेसाठी उमेदवारांना चाचणी (लेखी) परीक्षेत किमान ५० टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील,तथापि, अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती/विमुक्त जाती व भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग/ सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग/ आर्थिकदृष्टया दूर्बल घटक/ इतर मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५० टक्के ऐवजी ४५ टक्के गुण मिळविण्याची अट राहील.

१४.२.३ लेखी परीक्षेत मागासवर्गीय उमेदवारांना ४५ टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यामुळे पर्याप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास जाहिरातीत नमूद केलेली पदे रिक्त राहत असली तरीही कोणत्याही परिस्थिती किमान पात्र गुणांची टक्केवारी (४५%) पेक्षा कमी केली जाणार नाही आणि अराखीव उमेदवारांसाठी ५० टक्के पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यामुळे पर्याप्त उमेदवार उपलब्ध न झाल्यास जाहिरातीत नमूद केलेली पदे रिक्त राहत असली तरीही कोणत्याही परिस्थिती किमान पात्र गुणांची टक्केवारी (५०%) पेक्षा कमी केली जाणार नाही तसेच याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्यास त्यावर विचार केला जाणार नाही. सदरील निवेदने कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील.

१४.२.४ गट-क पदांकरीता १०० प्रश्न असलेली २०० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल.

१४.२.५ सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रीका एकूण १०० प्रश्नांची वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील.प्रश्नपत्रीकेतील प्रत्येक प्रश्नास ०२ (दोन) गुण ठेवण्यात येतील.

१४.२.६ गट-क संवर्गातील पदांकरीता परीक्षेचा कालावधी २.०० (दोन) तासाचा राहील.

१४.२.७ शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक प्रानिमं-१२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दिनांक ४ मे, २०२२ मधील तरतूदीनुसार संवर्ग क्र.१ ते ५ या सर्व पदांकरीता मौखिक (मुलाखती) परीक्षा घेण्यात येणार नाहीत.

१४.२.८ उमेदवार कोणत्या प्रवर्गाचा आहे अथवा उमेदवाराने कोणत्या आरक्षित पदाकरिता दावा केला आहे, याचा विचार न करता सर्व पात्र उमेदवारांचा (सर्वसाधारण/अराखीव) पदांसाठी प्रथम विचार करण्यात येईल. सदर प्रक्रिया सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्रमांक :एसआव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दि. १३ ऑगस्ट, २०१४ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक : संकीर्ण- १११८/प्र.क्र.३९/१६-अ दि. १९ डिसेंबर २०१८ मधील कार्यपध्दतीनुसार तसेच या मध्ये वेळोवेळी झालेल्या सुधारणेनुसार करण्यात येईल.

१४.२.९ निवडसूचीमध्ये समाविष्ट करावयाच्या उमेदवारांची संख्या ही जाहिरातीत नमूद केलेल्या रिक्त / उपलब्ध पद संख्येनुसार प्रवर्गनिहाय सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रानिर्म १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ मधील परिच्छेद १० मधील तरतुदीनुसार तयार करण्यात येईल.

१४.२.१० अंतिम निवड केलेल्या उमेदवारांची यादी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१४.२.११ भविष्यात कुठल्याही कारणास्तव कोणत्याही संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील पद रिक्त झाल्यास किंवा रिक्त राहील्यास कनिष्ठ पदावरील उमेदवारास रिक्त होणाऱ्या पदावर हक्क सांगता येणार नाही किंवा श्रेणीवाढ करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही. याबाबतची निवेदने प्राप्त झाल्यास कोणतीही कार्यवाही न करता परस्पर दप्तरदाखल करण्यात येतील.

## **१४.२.१२ निवडसूचीची कालमर्यादा :-**

**अ)** शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दि. ०४ मे, २०२२ मधील परिच्छेद ११ मधील तदतुदीनुसार निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करताना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या ग्राह्य राहील,त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**ब)** निवड समितीने तयार केलेल्या निवडसूचीमधून ज्येष्ठतेनुसार उमेदवारांची नियुक्तीसाठी शिफारस केल्यानंतर शिफारस केलेला उमेदवार सदर पदावर विहित मुदतीत रुजू न झाल्यास किंवा संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार, किंवा जात प्रमाणपत्र/अन्य आवश्यक प्रमाणपत्रांची अनुपलब्धता / अवैधता किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव नियुक्तीसाठी पात्र ठरत नसल्याचे आढळून आल्यास अथवा शिफारस केलेला उमेदवार रूजू झाल्यानंतर नजिकच्या कालावधीत त्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा त्याचा मृत्यू झाल्याने पद रिक्त झाल्यास, अशी पदे त्या त्या प्रवर्गाच्या निवडसूचीतील अतिरिक्त उमेदवारांमधून वरिष्ठतेनुसार उतरत्या क्रमाने भरण्यात यावीत.मात्र, अशी कार्यवाही निवडसूचीच्या कालमर्यादेत करण्यात येईल.

**१५.१ <u>परीक्षेचे स्वरूप :-</u>**

**१५.१.१** नागपूर महानगरपालिकेचे संवर्गनिहाय खालीलप्रमाणे स्वतंत्र **बहुपर्यायी वस्तुनिष्ठ** ऑनलाईन पद्धतीने परीक्षा (Computer Based Test) घेण्यात येईल. प्रत्येक परीक्षा सत्राचा एकूण कालावधी दोन तास राहील.

परीक्षा ही Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परिक्षा आयोजित करण्यात येणार आहे. सत्र १ ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची कठिण्यता तपासण्यात येऊन त्याचे समानीकरण करणेचे (Normalisation) पध्दतीने गुणांक निश्चित करून निकाल जाहीर करण्यात येईल. सदर (Normalisation) सर्व परिक्षार्थी यांना बंधनकारक राहील. याची सर्व परिक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

| पदनाम | विषय (प्रश्न संख्य) | एकुण प्रश्न | दर्जा | माध्यम | प्रश्न संख्य | गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कनिष्ठ लिपीक (अतांत्रीक पद) | मराठी | २५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | १०० | २०० | २०० |
| | इंग्रजी | २५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | २५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | २५ प्रश्न | | | | | |
| विधी सहायक (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |
| कर संग्राहक (अतांत्रीक पद) | मराठी | २५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | १०० | २०० | २०० |
| | इंग्रजी | २५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | २५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | २५ प्रश्न | | | | | |
| ग्रंथालय सहायक (अतांत्रीक पद) | मराठी | २५ प्रश्न | माध्यमिक शाळा (१० वीं) | मराठी | १०० | २०० | २०० |
| | इंग्रजी | २५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | २५ प्रश्न | | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | २५ प्रश्न | | | | | |
| प्रोग्रामर (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| स्टेनोग्राफर (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |
| लेखापाल/ रोखपाल (अतांत्रीक पद) | मराठी | २५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | १०० | २०० | २०० |
| | इंग्रजी | २५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | २५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | २५ प्रश्न | | | | | |
| सिस्टीम ॲनॉलिस्ट (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |
| हार्डवेअर इंजिनियर (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |
| डेटा मॅनेजर (तांत्रीक पद) | मराठी | १५ प्रश्न | उच्च माध्यमिक शाळा (१२ वीं) | मराठी | ६० | १२० | २०० |
| | इंग्रजी | १५ प्रश्न | | इंग्रजी | | | |
| | बौध्दीक चाचणी | १५ प्रश्न | पदवी | मराठी व इंग्रजी | | | |
| | सामान्य ज्ञान | १५ प्रश्न | | | | | |
| | तांत्रीक | ४० प्रश्न | तांत्रीक विषय संबंधीत | | ४० | ८० | |

**१५.१.२** उपरोक्त प्रत्येक संवर्गाकरीता वेगवेगळ्या/ स्वतंत्र परीक्षा घेण्यात येतील तसेच Computer Based Test पध्दतीने घेण्यात येणार असून प्रश्नपत्रिकेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असेल.

**१६.१** **<u>परीक्षेकरीता अर्ज करण्याची पध्दत:-</u>**

**१६.१.१** नागपूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन खाते (User Registration) उघडणे.

**१६.१.२** विहित कालावधीत तसेच विहित पध्दतीने खालीलप्रमाणे लागू असेल त्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करुन अर्ज सादर करणे.

**१६.१.३** परीक्षा शुल्काचा भरणा विहित पध्दतीने करणे.

**१६.१.४** प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक राहील.

**१७.१** **<u>विहित कागदपत्रे/प्रमाणपत्रे अपलोड करणे :-</u>**

**(अ)** विविध सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणा-या उमेदवारांनी जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास ऑनलाईन अर्ज सादर करताना खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) अपलोड करणे अनिवार्य आहे :-

| अ क्र | प्रमाणपत्र / कागदपत्र | फाईल फॉमेट | किमान फाईल साईज | कमाल फाईल साईज |
|---|---|---|---|---|
| १ | अधिवास प्रमाणपत्र पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| २ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ३ | वयाचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ४ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ५ | सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ६ | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गाकरिता आरक्षणाच्या असल्याबाबतचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ७ | आर्थिकदृष्ट्या दूर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ८ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १० | खेळाडू आरक्षणकरीता पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| ११ | अनाथ आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १२ | प्रकल्पग्रस्त आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १३ | भुकंपग्रस्त आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १४ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणसाठी पात्र असल्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १५ | नावात बदल झाला असल्यास त्याचा पुरावा | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १६ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा (१० वी) | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १७ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १८ | अनुभव बाबतचे प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| १९ | संगणक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |
| २० | जन्म प्रमाणपत्र | JPEG,JPG,PDF | १०० KB | २MB |

**ब)** अर्ज करतेवेळी अपलोड केलेल्या दस्ताऐवजांची पडताळणी ऑनलाईन परीक्षेसाठी पात्र करतांना करण्यात येणार नसुन अर्जदाराने अर्ज करतेवेळी भरलेली माहिती व अपलोड केलेले दस्तऐवज खरे आहेत असे गृहीत धरून लेखी परीक्षेसाठी अनुज्ञेय ठरविले जाईल.तथापी लेखी परीक्षेसाठी अनुज्ञेय ठरवले याचा अर्थ त्याची पात्रता विहीत कागदपत्रे व निकषांची तपासणी करून ठरवली आहे, असे समजता येणार नाही.

**क)** आरक्षणाच्या दाव्यांच्या अनुषंगाने आवश्यक प्रमाणपत्रे/ कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक राहील.

**ड)** लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या/दस्तऐवजाच्या साक्षांकित प्रती ,मुळ प्रमाणपत्राचे आधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांना बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास /किंवा विहीत पात्रतेचे निकष पूर्ण करित नसल्याचे आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

**१८.१ <u>सर्वसाधारण सूचना :-</u>**

उक्त सर्व पदांसाठी अर्ज फक्त नागपूर महानगरपालिकेचे ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येतील. अर्ज सादर करण्याच्या सूचना नागपूर महानगरपालिकेचे https:// www.nmcnagpur.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत तसेच नागपूर महानगरपालिका येथे अर्ज सादर केल्यानंतर विहितमुदतीत ऑनलाईन स्वरुपात विविध संवर्गाकरिता नमूद आवश्यक परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही. ऑनलाईन स्वरुपात फी चा भरणी केल्यानंतर अर्ज **"Your Application is Successfully Submitted"** असा मॅसेज येईलपर्यंत उमेदवारांना लॉग आऊट करू नये. अर्ज **Successfully Submit** झाल्याची खात्री करण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवारांची राहील.

**१९.१ इतर सर्वसाधारण अटी/शर्ती /सूचना**

१९.१.१ पात्रता/आरक्षणा संदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे.अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्टयार्थ आवश्यक कागदपत्राची पुर्तता केल्याशिवाय पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राहय समजला जाणार नाही.

१९.१.२ अर्जदाराने त्याचे पात्रते संदर्भातील सर्व आवश्यक मुळ दस्ताऐवज/ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे पडताळणीचे वेळी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

१९.१.३ अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करीत असल्याबाबत त्याने सक्षम प्रधिकरणाचे किंवा महाराष्ट्रात जन्म झाल्याबाबत जन्मदाखला अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१९.१.४ उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेची प्रवेशपत्रे, परिक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे, पदताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, तात्पुरती निवड व अतिरिक्त सूची, अंतिम निवड व अतिरिक्त सूची व इतर सर्व सूचना हया वेळोवेळी नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील त्याबाबत उमेदवारांसोबत पत्रव्यवहार अथवा वेगळयाने संपर्क केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रीया पूर्ण होईपर्यन्त वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. **संकेतस्थाळावरील सूचना पाहिल्या नाही या कारणास्तव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.**

१९.१.५ निवड झालेल्या उमेदवारांला नियमित तत्वावर नियुक्ती नंतर नागपूर महानगरपालिका सेवा विनियम लागु होतील.

१९.१.६ निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/सेवा-४ दिनांक ३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना (Defined Contribution Pension Scheme-DCPS) लागु राहील.

१९.१.७ शासन निर्णय क्र संकीर्ण/२००७/पडताळणी नवी-२६ दि. २१/११/२००७ अन्वये निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द कोणताही गुन्हा नोंदविलेला नाही अथवा सिध्द झालेली नाही असे चारित्र्य प्रमाणपत्र संबधीत पोलीस ठाण्याकडून प्राप्त झाल्यानंतर त्याची/तीची सदर पदावर नेमणूक केली जाईल.

१९.१.८ महाराष्ट्र शासनाकडीत आदेश क्र. एस. आर. व्ही-२०००/प्र.क्र. १७/२०००/२०१२ दि.०१/०७/२००५ नुसार लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१९.१.९ नमूद पदावर अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी उमेदवाराची नागपूर महानगरपालिकेचे रुग्णालय मार्फत वैद्यकिय तपासणी केली जाईल व त्यामध्ये वैद्यकिय दृष्टया पात्र झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल.उमेदवारांनी नौकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल.अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत

१९.१.१० नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारानी विहित केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादी विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय नागपूर महानगरपालिकेच्या सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाहीत.

१९.१.११ निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर उमेदवारांची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांचे अर्जात व ऑनलाईन परिक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा

खरी माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अश्या उमेदवारांची उमेदवारी निवड, नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

१९.१.१२ नागपूर महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दिनांकास व ठिकाणी पात्र उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१९.१.१३ सरळसेवा भरती प्रक्रियेत अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंन्तच्या काळात घडणारे बदल उदा. निलंबन, दंड, फौजदारी खटला, शिस्तभंग विषयक अथवा तत्सम कारवाई इत्यादी, वेळोवेळी कळविणे आवश्यक आहे. अर्ज सादर केल्यानंतर घडून आलेले बदल न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

१९.१.१४ नागपूर महानगरपालिकेने वेळावेळी घेतलेले निर्णय संबंधीतावर बंधनकारक असतील

१९.१.१५ सामाजिक आरक्षण, समांतर आरक्षण, मागास प्रवर्ग/नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र, भुकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, महिला, माजी सैनिक, खेळाडू, अनुभव पात्रता इत्यादी संदर्भात वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या/येणा-या शासन निर्णयाप्रमाणे नागपूर महानगरपालिकेच्या सेवाप्रवेश नियमानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

**२०.<u>विशेष सूचना :-</u>**

१) नागपूर महानगरपालिकेस सादर करण्यात आलेली सर्व कागदपत्रे/अभिलेख ही महागनरपालिकेच्या अभिलेखाचा भाग होतील व ती गोपनिय मानली जाईल.

२) जर एखादया उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय किंवा इतर प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

३) मध्यस्त/ठग/नागपूर माहानगरपालिकेच्या संबंध असल्याचे भासविणा-या व्यक्ती यांच्या गैरमार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याची उमेदवारांना सूचना देण्यात येत आहे.

२१.१. **<u>परीक्षा केंद्र निवड:-</u>**

२१.१.१. परीक्षासाठी केंद्राच्या उपलब्धतेनुसार उमेदवारास परीक्षा केंद्र व परीक्षा दिनांक तसेच परीक्षा सत्र प्रवेशपत्राव्दारे नेमून देण्यात येईल. याबाबत नागपूर म.न.पाचे त्या त्या वेळचे धोरण व निर्णय अंतिम मानण्यात येईल.

२१.१.२. वरीलप्रमाणे परीक्षा केंद्र निवडीची प्रक्रिया, उमेदवाराने अर्जामध्ये दिलेले पर्याय व उपलब्ध परीक्षा केंद्र या आधारे करण्यात येईल,तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी कोणत्याही कारणांमुळे एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास इतर उपलब्ध परीक्षा केंद्रापैकी परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.याबाबत आयुक्त, महानगरपालिका,नागपूर यांचे निर्णय अंतिम राहील.

२१.१.३. नेमून देण्यात आलेले परीक्षा केंद्र / परीक्षा दिनांक किंवा परीक्षा सत्रात बदल करण्याची कोणतीही विनंती मान्य करण्यात येणार नाही. तसेच त्याबाबत कोणताही पत्र व्यवहार विचारात घेण्यात येणार नाही

२१.१.४. नेमून देण्यात आलेले कोणतेही परीक्षा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या परीक्षा केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुसऱ्या परीक्षा केंद्रावर करण्यात येईल. असा बदल केल्यास, त्याबाबतची सूचना Email किंवा SMS व्दारे तसेच संकेतस्थळावरील सूचनेव्दारे संबंधितांना दिली जाईल.

**२२.१ सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाईल.**

**२२.१.१ <u>अराखीव - रुपये १०००/-</u>**

**२२.१.२ <u>मागासवर्गीय/ आर्थिक दूर्बल घटक/ अनाथ — रुपये ९००/-</u>**

२२.१.३ परीक्षा शुल्क ना-परतावा (Non-Refundable) आहे.

**२२.१.४ माजी सैनिक उमेदवार साठी परीक्षा शुल्क लागु राहणार नाही.**

२२.१.५ कोणत्याही कारणास्तव पदभरती प्रक्रिया स्थगित / रद्द झाल्यास पदभरती शुल्क उमेदवारास परत करण्यात येणार नाही.

२२.१.६ परीक्षा शुल्काचा भरणा हा फक्त Online पध्दतीनेच करावयाचा आहे. परीक्षा शुल्काचा भरणा ऑनलाईन पध्दतीने कोणत्याही एका पेमेंट गेटवेच्या माध्यमातून क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, यु.पी.आय अथवा नेटबँकिंगद्वारे करता येईल.यात नमूद केल्याप्रमाणे Online पध्दती व्यतिरिक्त इतर कोणत्याही पध्दतीने भरणा केलेले परीक्षा शुल्क हे विचारात घेतले जाणार नाही व असा उमेदवार हा परीक्षेसाठी पात्र असणार नाही.

२२.१.७ परीक्षा शुल्काचा भरणा करताना बँक खात्यामधून परीक्षा शुल्काच्या रकमेची वजावट झाल्यावर परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वीपणे झाला (Payment Successful) असल्याचा संदेश या कार्यालयाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या पृष्ठावर प्रदर्शित झाल्याशिवाय व परीक्षा शुल्काची पावती तयार होऊन अर्ज **Successfully Submit** झाल्याशिवाय संकेतस्थळावरील संबंधित पृष्ठावरुन आणि/अथवा खात्यातून **लॉगआऊट होऊ नये**

२२.१.८ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी झाला आहे किंवा कसे, याची स्थिती (Status) लगेच अवगत होईल. खात्यातून Logout होण्यापूर्वी परीक्षा शुल्क यशस्वीपणे भरले असल्याबाबत व बँकेकडून व्यवहार (Transaction) पूर्ण झाला असल्याबाबत खात्री करण्याची व अर्ज **Successfully Submit** झाल्याची ,खात्री करणेबाबतची जबाबदारी उमेदवाराची आहे.

२२.१.९ परीक्षा शुल्काचा भरणा यशस्वी न झाल्यास पुन्हा शुल्क भरण्याची कार्यवाही प्रस्तुत जाहिरातीच्या /अधिसूचनेच्या अनुषंगाने विहीत दिनांकापूर्वीच करणे आवश्यक आहे. कोणत्याही कारणास्तव व्यवहार अयशस्वी ठरल्यास यासंदर्भातील तक्रारीची या कार्यालयाकडुन दखल घेतली जाणार नाही.

२२.१.१० उमेदवाराने एका पेक्षा अधिक सेवा अथवा परीक्षेसाठी अर्ज केलेला असल्यास विहित केल्याप्रमाणें प्रत्येक परीक्षा अथवा सेवेसाठी त्याने स्वतंत्र परीक्षा शुल्क भरणा करणे आवश्यक आहे.

२२.१.११ विहित मुदतीत परीक्षा शुल्काचा भरणा करु न शकलेल्या उमेदवारांचा संबंधित भरतीप्रक्रिये करीता विचार केला जाणार नाही. यासंदर्भात या कार्यालयाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सूचनांमधील संबंधित तरतुदींचे अवलोकन करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

## २३.१ <u>अर्ज सादर करण्याची प्रक्रिया :-</u>

२३.१.१ प्रस्तुत परीक्षेसाठीचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील.

२३.१.२ इच्छुक व पात्र उमेदवाराला वेब आधारित (Web based) ऑनलाईन अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर विहीत कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

२३.१.३ उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑनलाईन अर्जामध्ये नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे.

२३.१.४ आनॅलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता “New User Registration” यावर Click करून नाव,संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करून “Submit” बटन दाबावे त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी वर OTP येईल सदर OTP टाकल्यानंतर Log-in ID व Password ई-मेल आयडी द्वारे प्राप्त होईल तद्नंतर सदर Log-in ID व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल.

२३.१.५ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी.उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी . तसेच विहीत आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्तीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल.

एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

२३.१.६ ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत तसेच उमेदवारांसाठी इतर संबंधीत सविस्तर सूचना अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२३.१.७ Online अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

२३.१.८ अर्जाव्दारे चुकीची माहिती सादर करणाऱ्या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

२३.१.९ **अर्ज सादर करतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत: चे, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, किंवा बँक पासबूक यापैकी किमान कोणतेही एक फोटो असलेले मूळ ओळखपत्र अपलोड करणे आवश्यक आहे.**

**२४.१ <u>एक किंवा अधिक परीक्षासाठी / सेवांसाठी अर्ज करण्यासाठीचे निकष :-</u>**

२४.१.१ कोणताही उमेदवार हा संबंधित परीक्षा सेवासाठी विहित करण्यात आलेली अर्हता किंवा पात्रता धारण करीत असल्यास, कोणतीही एक किंवा त्यापेक्षा अधिक संवर्ग परीक्षेसाठी अर्ज सादर करू शकेल. मात्र अशा प्रत्येक परीक्षेसाठी त्याने परीक्षा शुल्क स्वतंत्र भरणा करणे आवश्यक आहे.मात्र एकाच पदासाठी एकापेक्षा अधिक Online अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

२४.१.२ Candidates who want to apply for Multiple posts can "Submit & Pay" the fees for Single Application First & then can click "+" "Apply Post" Section to apply for other posts using same Registration Number.

२४.१.३ संवर्गनिहाय परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांची संख्या विचारात घेऊन, आवश्यकता असल्यास अशी परीक्षा एकापेक्षा अधिक दिवशी व एकापेक्षा अधिक सत्रात घेण्यात येईल.एकापेक्षा अधिक सत्र असल्यास प्रत्येक सत्रासाठी अभ्यासक्रमावर आधारीत वेगवेगळी प्रश्नपत्रिका असेल.

**२५.१ <u>सेवा प्रवेशोत्तर शर्ती :-</u>**

१. ज्या पदांकरिता प्रचलित नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा विहीत केली असेल अथवा आवश्यक असेल तेथे त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार विभागीय/व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

**२६.१ <u>प्रवेशपत्राबाबत :-</u>**

२६.१.१ प्रस्तुत परीक्षेपूर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या दिनांकानंतर उमेदवाराचे प्रवेशपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेशपत्रात नमूद केलेल्या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

२६.१.२ प्रवेशपत्रात दिलेल्या सूचना प्रमाणे उमेदवाराने Online परीक्षा अर्ज भरताना जे छायाचित्र अपलोड केलेले असेल असे छायाचित्र प्रवेशपत्रावर चिकटवून ते परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**२७.१ <u>परीक्षेस प्रवेश :-</u>**

२७.१.१ परीक्षेस प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर https://nmcnagpur.gov.in उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे अंदाजे १० दिवस अगोदर संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करून घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

२७.१.२ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**२७.१.३ परीक्षेच्या वेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, किंवा बँक पासबूक,यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मुळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.**

२७.१.४ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेश प्रमाणपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेश प्रमाण पत्रावरील सूचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

२७.१.५ डिजिटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सीम कार्ड, ब्लूटुथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रोनिक उपकरणे, वह्या, नोटस परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, डीजीटल घड्याळ, परीगणक (Calculator) इ. प्रकारची साधने / साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत: जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास, ते परीक्षा केंद्राच्या बाहेर ठेवून त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी उमेदवाराची राहील.

२७.१.६ नागपूर महानगरपालिकेद्वारे परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधीत परीक्षा केंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबधीत उमेदवारांची राहील. या संदर्भात कोणत्याही नुकसानीस म.न.पा./परीक्षा घेणारी संस्था किंवा शाळा / महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार असणार नाही.

२७.१.७ सदर उपरोक्त नमूद प्रक्रीयेच्या अनुषंगाने या जाहिरातीच्या तरतुदीत काही विसंगती / संदिग्धता असल्यास त्याबाबत आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे निर्णय अंतिम राहील.

**२८.१ अर्ज सादर करणेसाठी मदत (HELP DESK)**

२८.१.१ भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे, प्रवेशपत्र डाउनलोड करणे यासंबंधी किंवा इतर अडचणी संबंधात उमेदवार मदतकक्षाशी (Help Desk) टोल फ्री क्रमांकावर मदतीसाठी संपर्क करू शकतात. यासाठी (HELP DESK) दूरध्वनी क्रमांक यावर (**9513252088-TCS**) सोमवार ते शुक्रवारी या दिवशी सकाळी १० वाजता ते ६.०० वाजता संध्याकाळी या कालावधीत संपर्क साधून उमेदवार मदत प्राप्त करून घेऊ शकतात.

२८.१.२ परीक्षासाठी विहित केलेला अभ्यासक्रम तसेच,परीक्षेची रचना व सर्वसाधारण सूचना अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२८.१.३ ही जाहिरात अर्ज नागपूर महानगरपालिकेच्या https://nmcnagpur.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**NMC HELPLINE NO – 9175414880**

(सोमवार ते शुक्रवार कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत राहील)

जाहिरात क्र.३९९/पी.आर

**दिनांक :-२२.०८.२०२५**

**हस्ता/-डॉ.अभिजीत चौधरी**
**(भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**महानगरपालिका, नागपूर**